सरपंच पदाचा पदभार नवीन निवडून येणाऱ्या
सरपंचास देण्याबाबत --

(29)

महाराष्ट्र शासन,

ग्राम विकास विभाग,

परिपत्रक क्रमांक-व्हीपीएफ-१४६९-२५२४४-ई,

सचिवालय, मुंबई-३२, २८ ऑक्टोबर १९६९.

**प रि प त्र क**

ग्राम पंचायतीचे माजी सरपंचानी निवडून आलेल्या नवीन सरपंचाना पदभार देण्याबाबत कायदेशीर तरतूद या विभागाचे परिपत्रक क्रमांक:व्हीपीएस-२४६७-३३९९२-ई, दिनांक ८ नोव्हेंबर १९६७, मध्ये स्पष्ट केलेली आहे. वस्तुत: ग्राम पंचायतीचे सर्व दप्तर व पैसे ग्रामपंचायत सचिवाचे ताब्यात असले पाहिजेत. विशेषात: नव्या सरपंचाची निवडणूक होण्याचे सुमारास ग्रामपंचायत सचिवाने विशेषाच जागरूकता दाखविणे जरूर आहे. अशा निवडणूकीपूर्वीच त्याने पंचायतीच्या सर्व दप्तराचा ताबा आपलेकडेच राहील, अशी दक्षता घेणे आवश्यक आहे. तरीसुध्दा सरपंच आपले पदाचा दुरुपयोग करून दप्तर व विशेषात: पैसे स्वत:जवळ ठेवतात असे आढळून आले आहे. पुष्कळदा याच कारणामुळे अफरातफर करण्यास वाव राहातो व नवीन सरपंचाला चार्ज देण्याबाबत माजी सरपंच टाळाटाळ करतात. या गोष्टींना आळा घालणे आवश्यक आहे. याकरितां मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १७९ मध्यें असलेल्या तरतुदी जर त्वरित व कठोरपणे अंमलात आणल्या गेल्या तर या प्रकारास आळा घालणे शक्य आहेह अशी शासनाची धारणा आहे. या कलमाखालील कार्यवाही करताना होणारा कालापव्यय कमी करणे शक्य आहे. त्या दृष्टीने खालील उपाय अमलात आणावेत:-

(१) नवीन सरपंचास त्याची निवडणूक झाल्याच्या तारखेपासून १ आठवडयाच्या आंत पदभार न मिळाल्यास ते जिल्हाधिकाऱ्याला कळविण्याची जबाबदारी पंचायत सचिवाची राहील. याबाबतीत त्याने कसूर केल्यास त्याचे विरुध्द खाते कारवाई केली जावी.

(२) वरीलप्रमाणे जिल्हाधिकाऱ्याला सूचना मिळाल्याच्या तारखेपासून १ आठवडयाच्या आंत त्यांनी जुन्या सरपंचाना "कारण दाखवा" नोटीस काढून उत्तर देण्याकरितां जास्तीत जास्त १ महिन्याचा अवधी द्यावा व कोणत्याही कारणासाठीं यांत मुदतवाढ देऊ नये.

OFFICE OF THE COLLECTOR, RATNAGIRI. Date 3 DEC 1969 Branch EB

(कृ.मा.प.)



For Collr. R'giri

(३) जिल्हाधिका-यांस अधिक चौकशी करणे जरूर वाटल्यास ती मुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी यांचेमार्फत न करता तहसिलदारांमार्फत वर दिलेल्या मुदतीतच करावी.

(४) दिलेली मुदत संपल्यावर जुन्या सरपंचाचे उत्तर आले अथवा न आले तरी जिल्हाधिका-यांनी १ आठवडयाच्या आंत कलम १७९(१) व(२) खाली जरूर ते आदेश काढून त्यांची अंमलबजावणी करावी.

२. वर सुचविलेली कार्यप्रणाली व वेळापत्रक कसोशीने अंमलात आणले तर नव्या सरपंचाना पदभार देण्यात होणारा विलंब केवळ कमी होणार नाही तर अशा प्रकारांना आळाही बसेल तेव्हा सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विनंती करण्यांत येते की त्यांनी वरील सूचना व कार्यप्रणाली सर्व सरपंच व ग्रामपंचायत सचिव यांचे नजरेस आणाव्यात व त्यांचे पालन योग्य त-हेने होते आहे याबाबत विशेष दक्षता घ्यावी. याबाबतीत जिल्हाधिका-यांवर विशेष जबाबदारी आहे याची जिल्हाधिका-यांनीही जाणीव ठेवावी.

३. विभागीय आयुक्त यांनी वरील कार्यप्रणाली कितपत यशस्वी होते यावर विशेष लक्ष ठेवावे व एक वर्षाचे अनुभवानंतर त्याबाबतीत आपला संकलित अहवाल शासनाला पाठवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या हुकूमाने व नावाने,

द. वि. साऊरकर,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग.

प्रति -

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व उपनगर यांचे जिल्हाधिकारी सोडून),

सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

सर्व गट विकास अधिकारी,

अ-२, शाखा, ग्राम विकास अधिकारी विभाग,